Jagriti
(Hema)

# जागृती

[कामगार चाळीतील एक खोली. सरला पंचवीस वर्षांची असून तिला तीन मुले आहेत.
पडदा उघडतो तेव्हा सरला भाकऱ्या बनवत आहे. तिच्या भोवती मुले आपापल्या थाळ्या घेऊन बसली आहेत. सरला त्यांना भाकरी व डाळ वाढते. ]

शंभू– (त्रासून) आई, आज भाजी नाही ?

सरला– नाही.

शंभू– मग, मी नाही जेवत. हे काय जेवण आहे का ? गेले कित्ती दिवस डाळीशिवाय काहीच नाही.

विजू– आणि आजतर डाळीला फोडणीसुद्धा नाही.

सरला– उगीच कटकट करू नका. असेल ते मुकाट्यानं खा.

पुष्पा– शंभू, विजू मी बघा कशी जेवते आहे. संप संपेपर्यंत हे असंच जेवायचं. नंतर सर्व काही ठीक होईल.

सरला– कशाचं काय ठीक होतय ? संप संपला तरी हीच रड असायची आपली. तुमचा बाप जोपर्यंत युनियनचं काम करतो तोपर्यंत हे असंच चालायचं. मग परिस्थिती सुधारण्याची आशाच नको. त्याची नोकरी कधी सुटेल काय सांगायचं ?

शंभू – अण्णा असं का करतात ? त्यांना आपली काहीच काळजी नाही का ?

नामदेव–(पडद्याआडून पुढे येत) कोण म्हणतय मला काहीच वाटत नाही म्हणून ? कुठल्याही बापा इतकाच मी तुमच्यावर प्रेम करतो. उद्या तुम्हाला चांगले दिवस यावेत म्हणून तर हे सगळं करतोय मी.

सरला – कसले चांगले दिवस येतायत ? आज आम्ही इथे मरायला लागलोय. गाजरासारखी आपली मुलं वाळत चालली आणि तुमचं आपलं उद्याच चाललंय ! हा उद्या उद्या तरी किती दिवस ऐकतेय मी.

नामदेव – सरू, तू असं का बोलतेस ? मुद्दामच दुर्लक्ष करतोय असं म्हणायचं आहे का तुला ?

सरला – हो तसंच.

नामदेव– जरा धीराने घे. मी काय म्हणतो ते तर ऐक अगोदर.

सरला– तुमच्या या नेहमीच्याच बडबडीचा कंटाळा आलाय मला. कसलं आलय उद्याचं डोंबलाचं भविष्य. तुम्ही स्वतःची जबाबदारी टाळताय.

नामदेव– गैरसमज आहे हा सरू तुझा. मी माझी जबाबदारी ओळखतो. स्वतःच्या घरापुरताच विचार करत नाही तर मी आपल्यासारख्या सर्व कुटुंबांचा विचार करतो. आपल्या सर्व कामगारांची स्थिती आणखीन वाईट होणार आहे हेही माहित आहे मला. त्यासाठी आपण वेळीच जागं होऊन भांडवलदारांविरुद्ध एकजुटीने दीर्घ लढ्याची जर तयारी केली नाही तर आपली परिस्थिती आणखीन बिकट होत जाईल. आणि म्हणूनच हे सगळं आपणाला समजून घेतलं पाहिजे.

सरला– तुमचे हे आपण–आपण कोण ? मला तर काहीच समजेनासं झालंय. तुमच्या सारखी चार टाळकीच युनियनमध्ये असतात. तुम्हाला असं वाटतं का, लोकांना त्यांचे प्रश्न समजत नाही ? तुम्हीच फक्त जादा हुषार आहात ! सांगा, कुठल्या आशेसाठी घरदार सोडून तुम्ही युनियन, युनियन करत बसलात ?

नामदेव– अरे बापरे ! इतका पारा चढलाय का तुझा ? जरा धीरानं घे.

सरला– (कंठ दाटून) मला नाही हे असलं सहन होत आता. मी एक आई आहे. मुलांचे सुकत चाललेले

चेहरे पाहवत नाही. चिंध्याची कपडी लोंबायला लागलीय अंगावर.

नामदेव – (शंभू शेजारी बसून त्याच्या पाठीवरून हात फिरवतो. सरलाच्या डोळ्यात पाणी आहे. ती त्याला जेवायला वाढते.)

( पडदा पडतो )

## २

(एक महिना झालेला आहे. संप संपला आहे. फॅक्टरी चालू झाली आहे. घराकडे पाहून लक्षात येतं की, नामदेवाला नोकरीवरून कमी केलेले नाही. सरला खाटेवर बसून तांदूळ निवडत आहे. मुले खोलीत दंगा करत आहेत. नळावरचा गोंगाट ऐकू येतो आहे.)

शंभू – अण्णा मला आज नवीन शर्ट आणणार आहेत ना ?

सरला – हो आज पगाराचा दिवस आहे ना.

विजू – आणि मला वह्या पुस्तकं ?

पुष्पा – आणि या दिवाळीत आपण खूप फटाके ही आणू (मुले आनंदाने नाचू लागतात.)

सरला – हे काही नाही. पहिल्यांदा सगळी देणी देऊन टाकू या. नाहीतर आपली सारखी देणेकऱ्यांची तगतग. ( मुलाचे चेहरे पडतात)

सरला – पण आपण गुढी पाडव्याला चांगली मजा करू हं. तोपर्यंत सगळ्या देणेकऱ्यांची तोंडं पण बंद होतील.

शंभू – मग मी अनिल सारखे कडक कपडे घालून इंग्रजी शाळेत जाणार नागं आई ?

सरला – नाही बाबा. अनिलचे वडिल मोठ्या फॅक्टरीत काम करतात. त्यांना जास्त पगार मिळतो.

शंभू – मग अण्णा का नाही त्या फॅक्टरीत जात ?

सरला – युनियन सोडून ते कसले दुसऱ्या फॅक्टरीत जातायत ? त्याना सगळ्या गावची उठाठेव. (सरला-पेक्षा वयाने मोठी असलेली एक बाई आत येते. ती गरोदर आहे.)

सरला – या, या. रमाबाई. फार दिवसांनी आलात इकडं.

रमा – तुमच्या मालकांच्या संपाबद्दल ऐकलय मी. फार हाल झाले असतील नाही का ? मी त्यावेळी माहेरी होते. आई जेर होती.

सरला– असं का ? आईला बरं नव्हतं ?

रमा – आता बरं वाटतय.

सरला – बरं रमाबाई, तुमची तब्येत कशी काय कितवा महिना ?

रमा–आठवा चालू आहे. खरं म्हणजे त्यासाठीच मी आले होते तुमच्याकडे (हुंदके देत रडू लागते.)

सरला–का हो ? काय झालं येवढं वाईट वाटायला तुम्ही बसा जरा.

रमा– (डोळं पुसत) मालकाना गेल्या महिन्यात नोटीस मिळालीय–कामावरून काढून टाकणार आहेत मिळतय त्यातच सरळ भागत नाही आणि तेही बंद होणार शिवाय त्यात हे बाळंतपण...

सरला– पण रमाबाई, तुमचे मालक तर मोठ्या फॅक्टरीत काम करतात आणि ते युनियनमध्ये सुद्धा नाहीत मग त्यांना का बरं काढतात ?

रमा– हो. हो. ते कुठल्याच युनियनमध्ये नाहीत.

सरला– अरे देवा ! मग असं कसं झालं ? त्यानाच एकट्यांना काढतात का ?

रमा– नाही, त्यांच्या सारख्या शंभर कामगारांना काढणार आहेत. आणि त्यातले कुणीच युनियनमध्ये नाहीत.

सरला– मग का बरं त्या सगळ्याना काढतात ?

रमा– मला काही कळनास झालयं.

सरला– रडू नका रमाबाई. करता येईल तेवढी मदत मी तुम्हाला करीन (विचारात बुडून जाते)

रमा– पुढच्या महिन्यात तुम्ही मला दोनशे रुपये देऊ शकाल का ? मला मागताना फार लाज वाटते. पण मी दुसऱ्या कुणाला विचारणार तुमच्या शिवाय ?

सरला– तुम्ही येवढं मनावर घेऊ नका रमाबाई. मी तुमच्यासाठी काहीतरी करीन. बघीन कुठंतरी.

रमा– (उठत) मी निघाले आता. लवकर जायला पाहिजे मला. धाकट्याची तब्येत पण ठीक नाही.

सरला– का ? काय होतयं ?

रमा– दोन दिवसापासुन तापानं फणाणलय बघा.

(रमा बरोबर सरला पण दारापर्यंत जाते. आणि चौकटीला डोकं टेकून उभी रहाते. पडदा पडतो.)

## ३

( मुले शेजारी गेलेली आहेत. सरला व नामदेव चहा पीत आहेत. )

नामदेव– सरला, अगदी गप्प का ? तब्येत ठीक नाही का तुझी ?

सरला– तब्येत ठीक आहे. पण मला एक प्रश्न पडलाय...

नामदेव– (आश्चर्याने) कसला प्रश्न ?

सरला– (थांबून) आज रमाबाई आल्या होत्या. त्यांना आठवा महिना चालू आहे. त्यांच्यामागे साडे-सातीच लागली आहे.

नामदेव– कसली साडेसाती ?

सरला– त्यांच्या मालकाना कामावरून काढणार आहेत.

नामदेव– हो. समजलय मला ते. आणखीन बऱ्याच लोकांना कामावरून कमी करणार आहेत.

सरला– तुम्हाला माहीत आहे ? मग बोलला नाहीत कधी ?

नामदेव– माझं बोलणं तू कधी सरळ ऐकून घेतलेस का ? मी युनियनचं काम करतो म्हणून तू रागावतेस. मी घराकडे दुर्लक्ष करतो. असंच तुला वाटतं.

सरला – हो. मला वाटतच तसं. मी आपली आडाणी. तुम्ही काय म्हणता ते मला कधी कळलंच नाही. रमाबाईंचे मालक युनियनमध्ये नाहीत तरी का बरं काढतात त्यांना कामावरून ?

नामदेव– (आश्चर्याने व उत्साहाने) सरू, तूच का विचारतेस हे ? मला खरचं वाटत नाही.

सरला– ते राहू द्या. मला हे सांगा, हे मोठे कार-खाने पण कामगारांना का बरं काढून टाकतात ? छोट्या कारखान्यातून काढलेल्या कामगारांनी मग कुठं जायचं ? मोठ्या कारखान्याकडे इतका पैसा असतो मग त्यांनी जादा कामगाराना नको का काम द्यायला ?

नामदेव– सरू, आता तू महत्त्वाच्या प्रश्नाला हात घातलास. आमच्या सारख्या लहान कारखान्यातून कामगाराना का काढत असावे असे तुला वाटतं ?

सरला– तुम्ही युनियन करता म्हणून.

नामदेव– पण युनियन करत नाहीत त्यानाही काढ-तात हे तुला दिसलंच. त्याला बरीच कारणं आहेत.

त्यातलं एक म्हणजे काम नसलेल्या लोकांची संख्या बरीच आहे. ते अगदी कमी मजुरीत काम करायला तयार असतात. आणि हे मालकाला चांगलं माहीत असतं. याचाच गैरफायदा मालक घेत असतो. मिळणारा पगार कमी पडतो म्हणून जुने लोक जास्त पगार माग-तात. मग जुन्या लोकांना काढून, कमी पगारात काम करायला तयार असलेले नवीन लोक मालक कामावर घेतो.

सरला – म्हणजे तुम्हाला ते कधीही काढून टाकतील ?

नामदेव – तुला तर हे चांगलच कळायला लागलंय. सरू, तू अडाणी आहेस असं कोण म्हणेल ?

सरला – (लाजून हसून) आणखी हे सांगा की मोठ्या कारखान्यातूनही याच कारणासाठी कामगाराना काढतात का ?

नामदेव – हो ना. पण त्याला आणखीन दुसरी ही कारणं आहेत. तुला ती समजतात की नाही कोण जाणे.

सरला – (जरा रागावून) आता तर म्हणालात की मी हुषार आहे.

नामदेव – अशी रागावू नकोस. मी सांगतो ते नीट ऐक. मोठ्या कारखान्याकडे खूप पैसा असतो. त्या पैशांनी ते सुधारीत मोठ-मोठी यंत्रे आयात करतात.

सरला – आयात ? आयात म्हणजे काय ?

नामदेव – आयात ?

(सरला मान डोलावते)

नामदेव – असं होय. मग ऐक तर. आयात म्हणजे विलायतेतून वस्तू विकत घेणे. आणि निर्यात म्हणजे काय सांग बघू ?

नामदेव – तुम्हीच सांगा.

नामदेव – निर्यात म्हणजे आयातच्या अगदी उलट

सरला – (मधेच ) म्हणजे आपल्या देशातल्या वस्तू परदेशी पाठवणं, होय ना ?

नामदेव– (हसतो) अगदी बरोबर.

सरला– बरं. मला हे सांगा मोठे कारखाने काय विकत घेतात ? म्हणजे काय आयात करतात ? (खुदकन हसते)

नामदेव– (हसण्यात सामील होतो) अरे, तू तर

अगदी कामगार स्त्री सारखीच बोलायला लागलीस. तू सुद्धा कारखान्यांत काम करू शकशील.

सरला– (उत्साहित होऊन) मी ? तुमचं काही-तरीच––

नामदेव– तुला माहितच असेल, अगं कितीतरी बायका कारखान्यात कामं करतात. आमच्याच कार-खान्यात बघ ना.

सरला– त्यांचं ठीक आहे हो. पण माझं कसं त्याच्याशी जमेल. मला स्वयंपाक, मुलं, घर...

पण ते राहू द्या. मला हे सांगा बरं, की मोठे कार-खाने... काय बर तो शब्द ?

नामदेव– आयात ?

सरला– हो ! हो ! ! आयात. मोठे कारखाने आयात का करतात ?

नामदेव– त्याचं असं आहे बघ सरू, मोठ्या आणि सुधारीत यंत्रामुळे त्यांना कमी कामगार लावून जास्त काम करून घेता येते. त्यामुळे त्याना जास्त फायदा मिळतो.

सरला– मग बेकार होणाऱ्या लोकांची काहीच काळजी नाही का त्यांना ?

नामदेव– अगं, फॅक्टरी त्यानी स्वतःच्या फायद्या-साठी काढली आहे. कामगारासाठी नव्हे.

सरला– म्हणजे त्यांचा फायदा तसं कामगाराचं नुकसान असंच ना ?

नामदेव– आता कसं अगदी बरोबर उत्तर दिलस. आपलं नुकसान होऊ नये, म्हणून आपणच नको का लढायला ? आणि म्हणूनच आम्ही युनियन करतो.

सरला – पण युनियन करून सगळे प्रश्न सुटणार आहेत का ?

नामदेव – त्यासाठी आणखी पुष्कळ गोष्टी केल्या पाहिजेत. युनियन ही पहिली गोष्ट झाली. आणि त्यातही काही कामगार असे असतात की, युनियन म्हटलं की त्यांचं टाळकं फिरतं !

सरला – का बरं ? म्हणजे त्यांना नाही आवडत युनियन ?

नामदेव – त्याचं ही एक कारण असं आहे की अश --कामगारांना वाटतं की, कारखानदार मालक आपणाला जगवतो. पगार देतो.

सरला – पण पगार तर किती कमी मिळतो.

नामदेव – ते त्यांना कळत काही ना. जेवढं काम करतो तेवढा मोबदला मालक कधीच देत नाही. काम-गारानं जगून उद्या कामासाठी हजर व्हावं एवढाच पगार मालक देतो आणि बाकी फायदा म्हणून तो आपल्या खिशात घालतो. मालक कामगारांच्या जिवा-वर, स्वतःच्या फायद्यासाठी कारखाना चालवतो हे बऱ्याच लोकांना समजत नाही.

सरला – म्हणून ते युनियन विरूद्ध वागतात असं ?

नामदेव – होना. म्हणून आम्ही युनियन बांधून कामगारांना त्यांच्या शोषणाची जाणीव करून त्यांच्यात जागृती निर्माण करतो. मग हळू हळू त्यांना सर्व गोष्टी पटतात.

सरला – बरं झालं. आज तुम्ही हे सगळं मला सम-जावून सांगितलं ते. आता माझ्या डोक्यात पण जागृती झाली. इतक्या दिवस मी उगीचच तुम्हाला सतावत होते.

नामदेव – तू जागृत झालीस ते बरंच झालं. आता तू मला मदतही करू शकशील.

सरला – हो नक्कीच. अहो पण तुमची मिटींग होती ना आज ?

नामदेवा – अरे हो खरंच की !

सरला– म्हणजे चांगलंच विसरला होता की तुम्ही.

नामदेव – (हसत) अरे वा तुझ्या विचारांना जागृती द्यायला मी असलो पण शेवटी मिटिंगला जायला तूच मला जागृती दिलीस की ? (उठत) निघालोच मी.

(पडदा पडतो)

–– हेमा